ISSN-2320-4494
RNI No.MAHAUL03008/13/2012-TC
Impact Factor : 3.7286

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

October Special Issue -III- 2021



ARTS | COMMERCE
SCIENCE | AGRICULTURE
EDUCATION | MANAGEMENT
MEDICAL | ENGINEERING & IT I LAW
PHARMACY | PHYSICAL EDUCATION
SOCIAL SCIENCE | JOURNALISM
MUSIC | LIBRARY SCIENCE |

www.powerofknowledge.co.in
E-mail : powerofknowledge3@gmail.com
Editor
Prof.Dr.Sadashiv H. Sarkate

Scanned by TapScanner

| | | | |
|---|---|---|---|
| 19 | गुलमोहर की छाँव तले धूप' के बहाने | प्रा. डॉ. बी. आर. नळे | 85-87 |
| 20 | डॉ.लक्ष्मीनारायण लाल के सामाजिक नाटकों में चित्रित समस्याएँ | अश्विनी महादेव जाधव | 88-92 |
| 21 | योगाचा इतिहास | प्रा.लवंगारे गणेश मारुती | 93-98 |
| 22 | कौटिल्याचे राज्य सस्थेबाबत विचार | प्रा.डॉ. आर.बी. लक्षटे | 99-104 |
| 23 | समकालीन आंबेडकरी चळवळ आणि राजकारणाची दिशा | प्रा.डॉ.माधव केरबा वाघमारे | 105-109 |
| 24 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या समतेविषयक विचारांची प्रासंगिकता | डॉ. मुंगे सिद्धार्थ | 110-114 |
| 25 | समकालीन भारत-नेपाळ संबंध :- एक आकलन | डॉ.प्रशांत प्रभाकरराव सराफ | 115-120 |
| 26 | 'मानवी जीवनामध्ये अभिनवरित अथवा फॅशनचे स्थान : एक आढावा" | डॉ.सुनंदा एकनाथराव आहेर | 121-124 |
| 27 | निमाडांचल में सामाजिकता का महत्व | श्रीमती मनिषा मण्डलोई | 125-129 |
| 28 | हिन्दुस्थानातील पहिला सर्कस : ग्रॅन्ड ईंडियन सर्कस | प्रा.डॉ.चंद्रकांत शिवराम गिरी | 130-135 |
| 29 | बाबासाहेबांचा खोतीविरोधी शेतकरी लढा | प्रा.डॉ.राणी जगन्नाथराव जाधव | 136-143 |



Scanned by TapScanner

# बाबासाहेबांचा खोतीविरोधी शेतकरी लढा

**प्रा.डॉ.राणी जगन्नाथराव जाधव**
सहयोगी प्राध्यापक व विभाग प्रमुख गृहशास्त्र विभाग
कला व विज्ञान महाविद्यालय, शिवाजीनगर, गढी, ता.गेवराई जि.बीड

गोषवारा (Abstract)

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी शेतकरी आणि शेतमजुरांच्या आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीत बदल घडविण्यासाठी क्रांतिकारी विचार मांडले.कोकणातील रत्नागिरी व कुलाबा या जिल्ह्यांमध्ये 'खोती पद्धती' प्रचलित होती.या पद्धतीमुळे शेतकऱ्यांना खोताचा जुलूम सहन करावा लागत असे. या पद्धतीमुळे कुळांच्या कैक पिढ्यांचा कोंडमारा झालेला होता.कारण 'खोत' गावचा मालकच असे.तो सुलताना प्रमाणे वागत असे देशावरचा जसा 'पाटील' तसा कोकणातील 'खोत' असे. कोकणातील मराठा, ब्राह्मण, आणि मुस्लिम समाजातील लोकांकडे शेकडो-हजारो एकर जमीन असे. या खोतांच्या शेतात राबण्यासाठी गावातील मागास, इतर मागास वर्गातील मंडळी असे. 'कुणबी' लोक खोतांची शेती तर 'महार' लोक त्यांची गुरे ढोरे राखणे,शेतात काम करण्याचे काम करत. बारा बलुतेदार, बहुजन समाज, बहुसंख्य कुणबी समाज आणि महार समाज या खोती पद्धतीने भरडला जात होता.कोकणातील पूर्व पार चालत आलेली ही 'खोती पद्धत'बंद करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लढा उभारला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची मुंबई कौन्सिलच्या सदस्यपदी निवड झाली. निर्वाचित सदस्य म्हणून त्यांनी 24 फेब्रुवारी 1927 रोजी विधिमंडळात अर्थसंकल्पावर पहिले भाषण केले.ते पहिले भाषण दलितांच्या प्रश्नांवर नव्हते तर शेतकऱ्यांचा प्रश्नावर होते. त्यांनी आपल्या 'बहिष्कृत भारत' या वृत्तपत्रातून 3 मे 1929 रोजी लेख लिहून शेतकऱ्यांच्या प्रश्नांना वाचा फोडली. 'जमीनदारीचे समूळ उच्चाटन केल्याशिवाय कोकणातील शेतकरी आणि शेतमजूर सुखी होणार नाही' असा त्यांचा ठाम समज होता. त्यांनी खोतांची दहशत संपविण्यासाठी मुंबई कायदेमंडळांच्या 17 सप्टेंबर 1930 रोजी पुणे अधिवेशनात खोती पद्धत नष्ट करणारे बिल मांडले होते. हे विधेयक मांडणारे विधिमंडळातील ते पहिलेच सदस्य होते या विधेयकाद्वारे त्यांनी त्यांचा उद्धार करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्यामुळे भूमिहीन असणारा कोकणातील कुणबी, बहुजन, अस्पृश्य समाज पहिल्यांदाच जमिनीचा मालक झाला.

**महत्त्वाचे शब्द (Keywords)**
**खोती पद्धती, शेतकरी लढा, कुळ, बाराबलुतेदार,कुणबी समाज, अस्पृश्य समाज इत्यादी.**



Scanned by TapScanner

## प्रस्तावना

विश्वरत्न,भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे व्यक्तिमत्त्व बहूआयामी असे आहे परंतु त्यांची ओळख "दलितांचे कैवारी","दलितांचे नेते"अशा शब्दात केली जाते. ज्यांनी आपले संपूर्ण जीवन भारतातील विषमतावादी व्यवस्था बदलून नवी व्यवस्था निर्माण करण्यासाठी खर्च केले ते महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे फक्त "दलितांचे नेते"कसे असू शकतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांच्या उत्थानासाठी केलेले कार्य सर्वपरिचित आहे. व्यवस्थेने गुलाम केलेल्या माणसाच्या मुक्तीचा लढा त्यांनी यशस्वीपणे पाडला. त्यामुळे दलित समाज जागा झाला आणि अत्याचाराविरुद्ध पेटून उठला,माणूस म्हणून जगण्याचा हक्क मागू लागला. आपल्या अस्तित्वासाठी प्रस्थापित व्यवस्थेला आव्हान देऊ लागला व आपले अस्तित्व प्रस्थापित व्यवस्थेला मान्य करण्यास त्याने भाग पाडले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य एवढेच नाही तर त्यांनी या देशातील अनेक सामाजिक,आर्थिक, राजकीय, धार्मिक,शैक्षणिक समस्या सोडविण्यासाठी आयुष्यभर कार्य केले. त्यांनी मांडलेले तत्वज्ञान, उभारलेला चळवळी या समाजातील सर्व जाती जमातीच्या उत्थापनासाठी आहे. त्यांना कोणत्याही जातीच्या,धर्माच्या, किंवा राज्याच्या सीमा नव्हत्या. तर देशाच्या सर्व चळवळीशी, आंदोलनाशी, प्रश्नांशी समाजातील सर्व घटकांशी एकरूप झालेले ते महान नेते होते. त्यांनी केलेल्या विविध क्षेत्रातील कार्यापैकी महत्त्वाचे क्षेत्र म्हणजे बाबासाहेबांनी शेतकऱ्यांच्या शोषण मुक्तीसाठी केलेले कार्य.प्रस्तुत शोधनिबंधामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शेतकरी शोषण मुक्तीसाठी खोती पद्धतीविरुद्ध प्रदीर्घ असा शेतकरी लढा उभारला त्याविषयी चर्चा करण्यात आली आहे.

## समस्या सूत्रण

भारत हा कृषीप्रधान देश असल्याने देशातील बहूतांश लोक शेती करतात. सध्या वर्तमानात भारतीयांसमोर जे जे मूलभूत प्रश्न आहे ते सर्व प्रश्न महात्मा फुले आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांच्या हयातीत मांडले होते.हे प्रश्न सोडविण्यासाठी चळवळी उभारल्या होत्या.सध्या राजधानी दिल्ली येथे 'नवीन कृषी कायदा' त्वरित रद्द करावा या मागणीसाठी बहूसंख्य शेतकऱ्यांनी आंदोलन केले. शेतकऱ्यांच्या शोषण मुक्तीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अशाच प्रकारचा परंतु व्यापक स्वरूपात व प्रदीर्घ म्हणजे हा लढा तब्बल सहा वर्ष चालला होती. खोती पद्धतीविरुद्ध चा शेतकरी लढा विषयी चर्चा प्रस्तुत शोधनिबंधात केली आहे.

## संशोधन विधान

'बाबासाहेबांचा खोती विरोधी शेतकरी लढा' या विषयाच्या अनुषंगाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सावकार आणि जमीनदारांच्या विरोधातील कोकणातील शेतकऱ्यांची चळवळ उभारून खोती किंवा जमीनदारी पद्धती नष्ट करण्यासाठी केलेल्या कार्याचे अध्ययन करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.



Scanned by TapScanner

## संशोधन क्षेत्र व मर्यादा

'बाबासाहेबांचा खोती विरोधी शेतकरी लढा ' या विषयाच्या अनुषंगाने अध्ययन करत असताना बाबासाहेबांनी खोती आणि जमीनदारी पद्धती नष्ट करून शेतकऱ्यांना शोषणमुक्त करण्यासाठी केलेल्या कार्याचाच अभ्यास करण्यात आला आहे.ही या संशोधनाची मर्यादा आहे.

## नमुना निवड

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय समाजाचे उत्थानासाठी सर्व क्षेत्राचा अभ्यास करून तत्वज्ञान मांडले व कार्य केले आहे.यात कृषी, शिक्षण,अर्थ,विधी, राजकारण,समाजकारण इत्यादीचा समावेश आहे. यापैकी परंपरागत चालत आलेली अमानुष अशी "खोती पद्धती" नष्ट करण्यासाठी उभारलेल्या शेतकरी लढा नमुना म्हणून निवड करण्यात आली आहे.

## तथ्यसंकलनाची साधने

प्रस्तुत शोधनिबंधासाठी तथ्यसंकलन करताना दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात आलेला आहे. यामध्ये विविध संदर्भ ग्रंथ,मासिके, वर्तमानपत्रे,इंटरनेट इत्यादीचा वापर करण्यात आला आहे.

## संशोधनाची उद्दिष्टे

1. खोती पद्धती विषयी माहिती घेणे
2.शेतकरी लढ्याची पार्श्वभूमी जाणून घेणे
3. शेतकऱ्यांच्या शोषणमुक्तीसाठी डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या कार्याचा आढावा घेणे.

## संशोधनाचे गृहीतकृत्य

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी तत्कालीन शेतकऱ्यांच्या प्रश्नांना वाचा फोडून लढा उभारला व विधायक मार्गाने खोती पद्धती नष्ट केली त्यामुळेच शेतकरी आणि शेतमजूर सुखी झाला.

## माहितीचे विश्लेषण

भारत हा शेती वर जगणारा देश आहे येथील शेती असणारे शेतकरी,शेती नसणारे शेतमजूर, कारागिर इत्यादी 70 टक्क्यांपेक्षा अधिक लोक शेतीवर जगतात असे असले तरी शेती आणि शेतकरी शतकानुशतके विवंचनेत जीवन जगत आला आहे. देशात शेती शेतकरी आणि शेती संबंधित समूहाचा गंभीरपणे विचार छत्रपती शिवाजी महाराज,महात्मा फुले, राजश्री शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महामानवांनीच केला आहे.या देशातील शेतीची स्थिती पूर्वी आणि आजही अत्यंत वाईट आहे. सतत दुष्काळ आणि शासनाचा पूर्वापार मनमानी कारभार यामुळे शेतकरी दैन्यायवस्थेत जीवन जगत आहे. आर्थिक स्थिती खालावली की शेतकरी आपल्या जमिनीत सावकाराकडे गहाण ठेवतात आणि यातून शेतकऱ्यांच्या शोषणाचं दुष्टचक्र चालू होते.



Scanned by TapScanner

## खोतांची सुलतानशाही

एक खोताकडे अनेक गावचे अधिकार असत. खोतांचे हक्क वंशपरंपरेने चालत असत. कुळाकडे जमीन कसण्यासाठी देताना खोत जमिनीचा 'कबुलायत' लिहून घेत. यात जाचक अटी असत. कुळांचा अंगठा उमटला की त्यातील अटीमुळे अनर्थ सुरू होत असे.

'कबुलायत' मधील एक अट 'वेठबिगारी' लादणारी होती. या अटीनुसार खोताच्या घरी काम असेल तेव्हा कुळाने विनामोबदला काम करायचे. त्याच्या घरी पाणी भरणे, साफसफाई करणे,सारवून घेणे, लाकडे फोडणे, घरातील लोकांची सेवा करणे अशी अनेक प्रकारची कामे करावी लागत.यासाठी नकार दिला किंवा टाळाटाळ केली तर कुळावर नाना तारेचे जुलूम केले जात. उदा. चिखलय ( म्हसळा )येथील एका कुळाने वेठबिगारी करण्यास नकार दिला त्यामुळे त्याला खोताने चाबकाने इतके मारले की तो मृत्युमुखी पडला. खोत गावचा मालकच असल्यामुळे सुलतानाप्रमाणे वागत असे. खोत विविध प्रकारे कुळावर अन्याय, जुलूम, जबरदस्ती करत असे व त्याच्या विरोधात शेतकऱ्यांना ब्र देखील काढता येत नसे. तो विविध प्रकारे कुळाकडून पैसे उकळत असते खोती हक्काबद्दल वेगळे पैसे द्यावे लागत. त्यामुळे शेतकऱ्यांवर कराचा बोजा पडत असे. खोत हा वाटेल तशी कुळाकडून बाकी वसूल करत असे.कुळांच्या झाडांवरील फळे, भाजीपाला, कोंबड्या इत्यादी वस्तू खोत उचलून नेत. म्हणजे कुळांना कोणत्याच प्रकारचे स्वामित्व नव्हते गुलामाचे जीवन त्यांना जगावे लागत असे यांच्या घरावर, घरातल्या कोणत्याही वस्तूवर खोताची मालकी असे. कुळावर विशिष्ट प्रकारचा पोशाख घालण्याची सक्ती असे. तसेच बायकांनाही विशिष्ट पद्धतीने लुगडे नेसण्याची सक्ती असे. खोत शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षणापासून प्रयत्नपूर्वक दूर ठेवत असे. कारण शिक्षित लोक त्याचे अधिकार चालू देणार नाही याची त्याला पूर्णपणे कल्पना होती. एखादा शेतकरी मुंबईला येऊन दोन पैसे मिळवून गावी गेला आणि त्याला धोतर कोट रुमाल वापरण्याचे सामर्थ्य असले तरी गावात गेल्यावर त्याला धोतर सोडून लंगोटी नेसणे भाग पडे.तसेच या कुळांना घरावर छप्पर म्हणून कौलारू वापरण्यास बंदी होती. छप्पर म्हणून भाताचा पेंढा वापरणे सक्तीचे होते. हा पेंढा खोताकडूनच घ्यावा लागत असे. हा पेंढा एक वर्षानंतर खराब होत असे. अशा प्रकारे कुळांना खोतावरच अवलंबून राहावे लागत असे.

खोत 'सावकारकी' करत. गरज पडली तर खोत कुळांना कर्ज देत. परंतु व्याजाचा दर खूप जास्त असे आणि परतफेडीचा पावत्या नसल्याने कर्जदार कधीच कर्जमुक्त होत नसत. खोतांकडे सत्ता व संपतीचे अवैध मार्गाने केंद्रीकरण झाले होते प्रचंड अशी विषमता पसरली होती. याचे एक उदा. 'भेंडखळ' (ता.उरण) गावच्या परिसरातील एकूण 960 एकर जमिनीपैकी 700 एकर जमीन त्या गावातील सावकाराकडे होती. अशा प्रकारचे अनेक सावकार कोकणातील परिसरात होते.शेतसारा, खोताचा जुलूम, सावकारी कर्ज यामुळे कुळांच्या कित्येक पिढ्यांच्या कोंडमारा झालेला होता. सर्व कुळ त्रस्त झाले होते. शासन दरबारी न्याय मागावा तर खोताचेच नातेवाईक कर्मचारी म्हणून बसलेले असत आणि ते खोताच्याच बाजूने न्याय देत. खोताच्या शेतात काम करून कुळांना एकूण उत्पन्नापैकी 40 टक्केपेक्षा कमी हिस्सा मिळत असे. त्यातही सावकाराकडून कर्ज घेतलेले असेल तर कधी कधी कुळाचे काम करूनही

पदरात काहीच पडत नसे अशा प्रकारे सर्व कोकण प्रांत या खोतांच्या जुलमाविरुध्द असंतोषाने धगधगत होता.

## शोषण मुक्तीसाठी शेतकऱ्यांचे संघटन आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जनआंदोलन

खोती पद्धती आणि सावकारशाहीने त्रस्त झालेले शेतकरी त्याविरुद्ध 1905 पासून संघटित होऊ लागले. हे संघटन वाढत गेले आणि त्यातूनच 'कोकण प्रांत शेतकरी संघ' स्थापन झाला व खोती व सावकारशाहीच्या विरुद्ध चळवळीला प्रारंभ झाला.या चळवळीचे नेतृत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर व त्यांचे सहकारी नारायण नागू पाटील (पेझारी),सुरबा नाना टिपणीस (महाड),भाई अनंतराव चित्रे, श्यामराव परुळेकर अशा मान्यवरांनी केले.यांनी जनआंदोलनादरम्यान संपूर्ण कोकण प्रांत पिंजून काढला. भाई अनंतराव चित्रे हे स्वतः 'खोत'होते. मात्र खोती पद्धतीमुळे बहूजन समाजावर होणारे अन्याय अत्याचार व समाजात निर्माण झालेली विषमता हे त्यांना सहन झाली नाही व या पद्धतीच्या समूळ उच्चाटनासाठी ते या चळवळीत सहभागी झाले. 1905 ते 1931 या कालावधीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासह नारायण नागू पाटील,भाई अनंतराव चित्रे,सी के बोले, टिपणीस, शामराव परुळेकर इत्यादी नेत्यांच्या नेतृत्वाखाली वढाव (ता.पेण) महाड, खेड,तळा रोहा,अष्टमी, वाशी( ता.पेण) पोलादपूर, चिपळूण,माणगाव ठिकाणी शेतकऱ्यांच्या सभा झाल्या.या दरम्यान शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करण्यात आली व बहूजन समाजाच्या शोषण मुक्तीसाठी एक व्यापक चळवळ उभी राहिली. या चळवळीचे वैशिष्ट्य म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सहकारी म्हणून काम करणारे ब्राह्मण, मराठा,कुणबी, आगारी इत्यादी तसेच अनुसूचित जातीतील शेतकरी होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची मुंबई कौन्सिलच्या सदस्य पदी निवड झाली निर्वाचित सदस्य म्हणून त्यांनी 24 फेब्रुवारी 1927 रोजी विधिमंडळात अर्थसंकल्पावर आपले पहिले भाषण हे शेतकऱ्यांच्या प्रश्नावर केले. या भाषणात शेतकऱ्यांच्या प्रश्नांची सरकारला जाणीव करून देत त्या प्रश्नात सरकारने भर टाकता कामा नये. सरकारची शेतसारा आकारणी पद्धती गैर अन्याय करणारी असल्याचे त्यांनी सांगितले. शासन आणि त्यांचे अधिकार बडे जमीनदार आणि सावकार खोत आणि पोलीस पाटील ही सारी यंत्रणाच शेतकऱ्यांना त्रास देते छळते असे त्यांनी ठणकावले. 25 डिसेंबर 1927 रोजी पेण तालुक्यात भाई अनंतराव चित्रे व नारायण नागू पाटील यांच्या नेतृत्वाखाली पार पडलेला परिषदेमध्ये मंजूर झालेल्या ठरवामध्ये 'खोती पद्धत नष्ट झाली पाहिजे', 'जमिनीची मालकी शेतकऱ्यांना व्हावी', मक्ते आणि व्याज कमी करावे, 'कबुलायत' चा नमुना बदलला पाहिजे' यासह 28 मागण्या होत्या.शेतकऱ्यांमध्ये झालेली जनजागृती आणि पेन येथील परिषदेमधील मागण्यांचा ठराव हे या हे 'चरी'च्या ऐतिहासिक संपाला प्रेरक ठरले.



Scanned by TapScanner

## चरीचा ऐतिहासिक संप

खोतीचे समूळ उच्चाटन करून शेतकऱ्यांच्या शोषणाला मूठमाती देण्यासाठी जगातील एकमेव प्रदीर्घ ठरलेला शेतकऱ्यांच्या ऐतिहासिक संपाला 'चरी' ता.अलिबाग येथे 27 ऑक्टोबर 1933 ला प्रारंभ झाला. हा संप 1933 ते 1939 अशी सहा वर्ष चालला. खोती आणि सावकारशाही विरुद्धच्या या संपात चरी (ता.अलिबाग) कोपरपाडा, कोपर, कोलटेंभी, रायंदे या गावासह एकूण पंचवीस गाव सहभागी झाले होते. कुळांनी जमीनदाराच्या जमिनी करायच्या नाहीत. अन्न पीकवायचे नाही असा निर्णय घेण्यात आला. या संपादरम्यान शेतकऱ्यांचे अतोनात हाल झाले प्रचंड उपासमार झाली. जंगलामधील लाकूड-फाटा तोडून दिवस काढावे लागले करवंदे, कांदा, बटाटे विकून जगावे लागले. मात्र तरीही सहा वर्ष शेतकरी संपावरून हटले नाहीत.

## बाबासाहेब आंबेडकरांचा संपास पाठिंबा आणि खोती पद्धत नष्ट करण्यासाठी कार्य

चरीच्या संपाच्या काळात दि 16 डिसेंबर 1934 रोजी शेतकरी परिषद भाई अनंतराव चित्रे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. या परिषदेस डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मुख्य मार्गदर्शक म्हणून आमंत्रित करण्यात आले होते.यावेळी बाबासाहेबांनी केलेल्या भाषणाने शेतकऱ्यांचा उत्साह वाढला. सर्वसामान्य बहुजन शेतकरी शोषणाविरुद्ध,अन्यायाविरुद्ध पेटून उठला.जातीभेद विसरून एकत्र संघटित झाला. बाबासाहेबांनी शेतकरी मजूर पक्षाची घोषणा याच परिषदेत केली.पुढे शंकरराव मोरे यांनी स्थापन केलेल्या 'शेतकरी कामगार पक्षाची' बीजेदेखील याच काळात रोवली गेली. 1935 मध्ये प्रांतिक विधिमंडळाच्या निवडणुका झाल्या त्यात बाबासाहेबांच्या स्वतंत्र मजूर पक्षाची 19 उमेदवार निवडून आले. चरीच्या शेतकरी संपाच्या परिणामातून 17 सप्टेंबर 1937 ला मुंबई प्रांताच्या विधिमंडळाचे कामकाज सुरू झाल्यानंतर बाबासाहेबांनी खोती पद्धत नष्ट करण्याचे विधेयक मांडले. तत्कालीन भारतात शेतकऱ्यांची गुलामगिरीतून मुक्तता करण्यासाठी लोकांनी निवडून दिलेल्या कायदेमंडळात असे विधेयक मांडणारे बाबासाहेब हे पहिले लोकप्रतिनिधी होते. 10 जानेवारी 1938 रोजी मुंबई कौन्सिलच्या असेंब्लीवर 20 ते 25 हजार शेतकऱ्यांनी भव्य मोर्चा काढला. या मोर्चात कोकण, सातारा, नाशिकसह अनेक जिल्ह्यातील शेतकरी सामील झाले होते. 'खोती पद्धती नष्ट करा'. 'सावकारशाही मूठमाती द्या' या प्रमुख मागण्यांसह इतर मागण्यासाठी हा मोर्चा होता. या शेतकरी मोर्चामध्ये भाषण करताना बाबासाहेब म्हणाले,"कष्टाळू लोकांची संघटना करावयाची झाल्यास त्यात जातिभेद,धर्मभेद यांना मुळीच थारा मिळता कामा नाही.कष्टाळू वर्ग अगोदरच बिकट आर्थिक दडपनाणे दडपला गेला आहे. अशा परिस्थितीत जी संघटना झाली आहे तीत विषमता दिसता कामा नये आणि मी म्हणत आहे अशा तऱ्हेचे सर्व जातीच्या कष्टाळू वर्गाचे संघटन पाहून मला आनंद होत आहे. म्हणूनच आजचा दिवस मी मोठा भाग्याचा समजतो कारण आजची आपली संघटना केवळ स्वार्थत्यागाच्या बळावरं उभारली आहे."



Scanned by TapScanner

बाबासाहेबांची स्फूर्तिदायक भाषणे शेतकऱ्यांना आत्मभान आणि आत्मबळ देणारी होती. 16 मे 1938 रोजी झालेल्या चिपळूण येथील भाषणात त्यांनी शेतकऱ्यांना 'मला तुमच्यापैकी प्राईम मिनिस्टर झालेला पाहायचा आहे' असे आवाहन केले. 'शेतकऱ्यांनी भेकडपणा सोडावा. खोताविरुद्ध संघर्षास सिद्ध व्हावे. त्याने काठीने मारले तर तुमची काठी उचलण्याची तयारी पाहिजे. मला 80 टक्के लोकांचे राज्य हवे आहे. मूठभर पांढरपेशा श्रीमंताचे नको आहे' असे त्यांचे ठाम मत होते.

## खोती पद्धतीचा अंत

शेतकरी संपाच्या आणि मोर्चाच्या परिणामाने शासनाने तत्कालीन महसूल मंत्री मोरारजी देसाई समिती नेमली. या समितीचा अहवाल शेती वहिवाटी करणाऱ्या शेतकऱ्यांनी आनंदाने आणि खोतांनी नाईलाजाने स्वीकारला. त्यामुळे 1933 साली सुरू झालेला चरीचा प्रदीर्घ संप 1939 मिटला. त्यावेळी मोरारजींनी दिलेले आश्वासन नारायण नागू पाटील यांनी मान्य केले. नारायण नागू पाटील त्यांच्या "कथा एका संघर्षाची" या आत्मचरित्रात म्हणतात 'मोरारजीभाई यांनी लवादनाम्याप्रमाणे दिलेला निकाल माझ्या अपेक्षेपेक्षा ही नि:पक्षपाती आणि समतोल होता.शेतकऱ्यांच्या काही मागण्या मान्य झाल्या. शेतकऱ्यांचा विजय झाला होता.' या प्रदीर्घ संपामुळे 1948 साली जमीन महसूल संहिता बदलली गेली. सर्वप्रथम जमीन कसणाऱ्या कायदेशीर कुळाचे नाव सातबारा,इतर हक्कात नोंदवली गेली. त्यानंतर 1948 साली ज्यावेळी 'कुळ कायदा' अस्तित्वात आला तेव्हा कुळांना अधिक अधिकार प्राप्त झाले.'खोती निर्मूलन अधिनियम' 15 मे 1950 पासून लागू करण्यात आले. त्यानुसार खोती पद्धत नष्ट झाली. अशाप्रकारे अन्यायकारक खोती पद्धतीचा अंत झाल्याने एक लाख 22 हजार 860 एकर जमीन मुक्त झाली व 'कुळवहिवाट' व 'शेतजमीन अधिनियम 1948' नुसार 'कसेल त्याची जमीन' हे तत्त्व लागू करण्यात आले.

## समारोप

शेतकऱ्यांच्या प्रश्नावर चिंतन करणाऱ्या, त्यासाठी चळवळी उभ्या करून विचार मांडणाऱ्या बाबासाहेबांना या देशातील शेती आणि शेतकऱ्यांचे सर्व प्रश्न संपवायचे होते. त्यासाठी ते सातत्याने कोकणातील शेतकऱ्यांच्या लढाईत सहभागी झाले. स्वतःला झोकून देऊन कार्य करत शेतकऱ्यांच्या हितासाठी विविध विधेयक मांडून त्यांनी अन्यायकारक खोती पद्धती नष्ट केली.शेतकऱ्यांच्या प्रश्नावर ग्रंथ लिहिणारे पहिले महापुरुष महात्मा ज्योतिराव फुले आणि वैधानिक विचारपीठावर शेतकऱ्यांचे प्रश्न मांडणारे पहिले महापुरुष म्हणजे डॉ बाबासाहेब आंबेडकर हे होत. शेती आणि शेतकऱ्यांचे प्रश्न वर्तमान काळात अधिक भयंकर होत आहेत हे प्रश्न सोडविण्यासाठी बाबासाहेबांचे शेतीसंबंधीचे विचार आजही तितकेच उपयुक्त आहेत. त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी जर आजच्या राज्यकर्त्यांनी केली तर खऱ्या अर्थाने शेतकरी शोषण मुक्त होऊन आर्थिक समानता निर्माण होईल व शेतकऱ्यांवर आत्महत्या करण्याची वेळ येणार नाही.



Scanned by TapScanner

संदर्भग्रंथ

1.दलितमित्र अधिकारी चंद्रकांत( वकील) (2014) खोती विरुद्धच्या लढ्याचा सुगावा प्रकाशन, पुणे.

2.डॉ.कुबेकर प्रल्हाद ( 2015) दलितेतरांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर- अनंत पैलूंचा सामाजिक योद्धा, सायन प्रकाशन,पुणे.

3.डॉ बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे खंड 18 भाग 2

4.बाबासाहेब आंबेडकर भाषणे आणि विचार खंड 4 कृषी संपादक डॉ धनराज डहाट

5.जाधव प्रमोद (एप्रिल2017) 'शेतकऱ्यांचे नेते,शेतकरी, मासिकातील लेख

6. www.bbc.com

7.https://www.google.com

■■■